# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

बाब क्रमांक : ४/१

## तिसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १३ सप्टेंबर १९९६ |
| वेळ | : | सकाळी १०.०० वाजता. |
| ठिकाण | : | वर्षा बंगला, मलबार हिल, मुंबई. |

बैठकीस उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

बाब क्रमांक : ३/१

प्राधिकरणाच्या दुसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करण्याचा ठराव पारीत झाला.

बाब क्रमांक : ३/२

दुसऱ्या बैठकीनंतर प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीसंबंधातील माहितीसाठी ठेवलेल्या टिप्पणीवर बैठकीत चर्चा झाली.



# तिसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त

मा.अध्यक्षांनी बैठकीच्या कामकाजास प्रारंभ करतांना सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत
करुन बाब क्र.३/१ अन्वये दिनांक २०/७/९६ रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त पक्के
करण्यासंदर्भात अभिप्राय विचारले व सर्वांच्या मान्यतेनंतर कार्यवृत्त मंजूर करण्यात आले.

विषयसूचीतील बाब क्र.३/२ संबंधात मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.जोसेफ यांनी
सांगितले की, दुसऱ्या बैठकीनंतर प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीसंबंधात मुख्य सचिवांच्या
अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली व विकास नियंत्रण नियमावलीला अंतिम स्वरुप देऊन नगर
विकास विभागाकडे पाठविण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण
नियमावलीच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र
शासनास सदर प्रारुप विकास नियंत्रण नियमावली हरकती व सुचनासाठी प्रसिध्द करुन ज्यांना
नोटीस दिलेली आहे त्यांना कलम ३७(२) प्रमाणे पुन्हा सुनावणी द्यावी लागणार असल्याने नगर
विकास विभागाने दिनांक २७.ऑगस्ट, १९९६ रोजी सदर प्रारुप विकास नियंत्रण नियमावली
राजपत्रात प्रसिध्द केली आहे. श्री.जोसेफ यांनी पुढे अशी माहिती दिली की, महाराष्ट्र प्रादेशिक
व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५२ अन्वये प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी
अधिकाऱ्यांना योजना मंजूरीसाठी अधिकार प्रदान करण्याची विनंती शासनाकडे केली आहे.
तसेच मुंबई महानगरपालिकेतील झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूरीच्या कामाशी संबंधित
असलेले तांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांना प्रतिनियुक्तीवर पाठविण्यासंबंधीची विनंती आयुक्त,
मुंबई महानगरपालिका यांच्याकडे केली आहे.

अतिरिक्त मुख्य सचिव, श्री.सिन्हा यांनी अशी माहिती दिली की, मुख्य कार्यकारी
अधिकाऱ्यांना कलम १५२ खाली अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव सादर झाला असून चार-

आठ दिवसात यासंबंधीचे आदेश निर्गमित होतील असे वाटते. मुख्य सचिवांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, प्रारुप विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) ला अंतिम स्वरुप देण्याची कार्यवाही चालू असतांनासुध्दा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना योजनाना मंजूरी देता येईल व त्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १५४ खालील आदेश सत्वर जारी होणे आवश्यक आहे. या संदर्भात मा.मुख्य सचिवांनी असे प्रतिपादन केले की, २ ऑक्टोबरपर्यंत विकास नियंत्रण नियमावली आणि योजना मंजूरीचे अधिकार प्रदान करण्याबाबत कार्यवाही केली जाईल. अतिरिक्त मुख्य सचिवांनी दि.२७/८/९६ रोजी राजपत्रात प्रसिध्द केलेल्यां वि.नि.नियमावलीवर अद्याप कोणतेही आक्षेप वा सुचना आल्या नसल्याचे तसेच ही मुदत २६.९.९६ रोजी संपणार असून त्यानंतर १ किंवा २ ऑक्टोबरपर्यंत अधिसूचना काढता येईल असे सांगितले. मा.अध्यक्षांनी असे निदेश दिले की, विहित मुदतीत कांही आक्षेप वा सुचना प्राप्त झाल्या तर त्यावर विनाविलंब कार्यवाही करावी.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी प्राधिकरणाकडे वर्ग करण्याबाबत मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त, श्री.गिरीश गोखले यांनी सांगितले की, १-२ दिवसात वर्ग करण्याबाबतचे आदेश काढले जातील. मात्र त्यांचे वेतन देणेबाबतची हमी दिल्यास बरे होईल. यावर मा.मुख्य सचिवांनी ह्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे दायित्व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने स्विकारले असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर मा.अध्यक्षांनी असे स्पष्ट केले की, त्यांना त्वरीत वेतन देण्यात येईल आणि त्यांच्या बसण्याची व्यवस्थाही म्हाडाच्या कार्यालयात करण्यात येईल. त्यासाठी म्हाडाच्या इमारतीतील संपूर्ण पाचवा मजला देण्यात येईल.

वेळ शिल्लक असल्याने योजनेच्या अडचणीसंबंधी कोणते विषय असतील तर चर्चेस घेण्याचे मा.अध्यक्षांनी सांगितले त्याप्रमाणे खालील विषयावर चर्चा झाली.

१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास 'निगम निकायचा' दर्जा देण्याविषयासंबंधात बैठकीत चर्चा झाली. यासंदर्भात या विषयासंबंधीची धारिका मा.मुख्यमंत्र्याच्या कार्यालयास सादर झाली असल्याचे समजताच मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष यांनी त्यांच्या प्रधान सचिवांना ही धारीका त्यांना दाखवून तात्काळ स्वाक्षरी घेऊन पुढे पाठवावी असे सांगितले.

२) संक्रमण शिबीरांशिवाय ही योजना राबविणे अवघड आहे असा विषय श्री.किरीट सोमैय्या यांनी उपस्थित केला त्यावेळी मा.अध्यक्षांनी चेंबूर संक्रमण शिबीरासंबंधी विचारणा केली. त्यावर प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांनी सांगितले की, वेगवेगळया ठिकाणी सुमारे १००० संक्रमण गाळे शिल्लक आहेत त्यापैकी या योजनेच्या कामासाठी ५०० गाळे देऊ. चेंबूर येथील संक्रमण शिबीराबाबत त्यांनी सांगितले की, त्याचे बांधकाम नकाशे/आराखडे मुंबई महानगरपालिकेकडे मंजूरीसाठी पाठविले आहेत. परंतु तुर्भे (मंडाले) येथील संक्रमण शिबीर समुद्र किनारपट्टीच्या केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार सध्या अडचणीत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणले. श्री.शशी प्रभू यांनी समुद्र किवा खाडी लगतच्या जमीनीवर ट्यूबुलर स्ट्रक्चरची संक्रमण शिबीरे चालू शकतील असे सांगितले. त्यावर मा.अध्यक्षांनी समुद्र किनारा किंवा खाडीजवळ अडचण असेल तर दुसरीकडे जागा पहावी असे सूचविले. तसेच संक्रमण शिबीराच्या संदर्भात संबंधीत विभागाच्या तिन-चार अधिकाऱ्यांनी आठवडयातून एकदा एकत्र बसून त्वरीत निर्णय घेऊन योजनेची अंमलबजावणी शीघ्रतेने करण्याबाबत मा.अध्यक्षांनी निदेश दिले.

३) २२५ चौ.फूट क्षेत्रफळाच्या किती योजना कार्यान्वित आहेत (ज्या पूर्वीच चालू झाल्या आहेत व २२५ चौ.फूट आहे त्यासुध्दा) व किती गाळे लोकांना दिले/देण्यात येणार आहेत, याबाबतची माहिती त्वरीत मिळू शकेल काय? अशी विचारणा मा.अध्यक्षांनी केली. सदर माहिती त्वरीत उपलब्ध नसल्याने ती प्राप्त करुन घेऊन त्वरीत १-२ दिवसात मा.अध्यक्षांना सादर केली जाईल असे मंत्री (गृहनिर्माण) यांनी सांगितले.

४) टी.बी.हॉस्पीटल व कस्तुरबा हॉस्पीटलजवळील झोपडपट्टीवासियांची पुनर्वसन योजना मुंबई महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र नसल्याने अडली असल्याचे मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष यांच्या निदर्शनास आणले असता सत्वर निर्णय घेऊन झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसन योजना कार्यान्वित होणे जरूरीचे आहे असे मा.अध्यक्षांनी आयुक्त, महानगरपालिका यांना सांगितले. झोपडपट्टी सुधारणा केल्यामुळे टी.बी.चे रुग्ण वास्तविक लवकर बरे होतील अशी पुष्टीही दिली. झोपडपट्टीवासियांना मदत करण्यास आयुक्त, महापालिका यांना मा.अध्यक्षांनी विनंती केली.

५) त्यानंतर संक्रमण शिबीरांचा विषय मा.अध्यक्षांनी पुन्हा चर्चेस घेतला व प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांना त्याची प्रगती विचारली. तसेच याबाबतीत दिरंगाई का होत आहे याचा खुलासाही विचारला. मा.अध्यक्षानी ज्या ठिकाणी रिकाम्या जागा आहेत त्या ठिकाणी त्वरीत संक्रमण शिबीरे बांधण्यात यावीत असे निदेश दिले. प्रधान सचिव (महसूल) यांनाही सांगण्यात आले की, शासकीय जमीनीचा आढावा घेऊन संक्रमण शिबीरासाठी त्वरीत उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच महानगरपालिकेच्या जमीनींही संक्रमण शिबीरासाठी घ्याव्यात असे सूचविले. या अनुषंगाने मुख्य सचिवांनी जमीनी हस्तांतरणाबाबत आठ दिवसात निर्णय घेऊन संक्रमण शिबीराची व्यवस्था म्हाडामार्फत तिन महिन्यात केली जाईल. तसेच म्हाडाचे ५०० संक्रमण गाळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी आरक्षित करू असेही सांगितले. श्री.किरीट सोमैय्या यांनी संक्रमण शिबीरे नसल्यामुळे बरेच प्रस्ताव तयार असूनही ते लोक पुढे येत नसल्याचे सांगितले. सर्व सभासदांचे लक्ष वेधून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, योजना व संक्रमण शिबीरे यांची सांगड घालू नये. कारण झोपडपट्टीधारक विनाकारण संक्रमण शिबीरासाठी आग्रह धरतात व योजना रेंगाळते. त्यापेक्षा जेथे झोपडपट्टी आहे त्याच ठिकाणी ट्यूब्यूलर स्ट्रक्चर बांधून संक्रमण शिबीर उभे करण्याचा सल्ला द्यावा हे उचित.

• ६) मा.राज्यमंत्री (नगरविकास) श्री.रविंद्र माने यांनी ज्याचे ३०० ते ३५० चौ.फूटाचे साइजाने गाळे आहेत त्यांना २२५ चौ.फूटाचा गाळा दिल्याने अन्याय होणार नाही का? असा प्रश्न उपस्थित केला त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी, कोणत्याही ठिकाणी २२५ चौ.फूटापेक्षा जास्त जागा देता येणार नाही हा धोरणात्मक निर्णय झालेला असून सर्व सभासदांना याबाबतीत माहिती असावी म्हणून हा विषय चर्चेस घेणे जरुरीचे आहे असे सांगितले. यावर मा.अध्यक्षांनी असे स्पष्ट केले की, समानता आणावयाची म्हटल्यावर सर्वांसाठी एकच तत्व लावणे आवश्यक आहे. कारण जो धोरणात्मक निर्णय आहे त्यापासून फारकत घेता येणार नाही.

७)मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी सभेत माहिती देतांना सांगितले की, विजयादशमीच्या आगोदर १००० गाळे वितरीत होणार आहेत. त्यावर मा.अध्यक्षांनी त्यापैकी १८० चौ.फूट किती व २२५ चौ.फूटाचे किती आहेत याची माहिती काढावी असे सांगितले.

यानंतर बैठक समाप्त झाल्याचे सूचित करण्यात आले.



दिनांक. १३/९/९६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीचे कार्यवृत्त.

| अ.क्र. | बैठकीत झालेले निर्णय | निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदारी. | अंमलबजावणीसाठी ठरविलेली कालमर्यादा. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | बाब क्र. ३/१ अन्वये प्राधिकरणाच्या. दि. २०/७/९६ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तास मंजूरी देण्याचा ठराव पारीत झाला. | काही नाही. | काही नाही. |
| २. | महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १५२ अन्वये प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना योजना मंजूरीसाठी अधिकार प्रदान करण्याचा निर्णय. | नगर विकास विभाग | नगर विकास विभाग यांनी त्यांच्याकडे आदेश दि. १३/९/९६ अन्वये मुख्य कार्य एम.आर.टी.पी. ॲक्ट च्या कलम १५२ अधिकार प्रदान करण्याबाबतचे आदेश केले आहेत. |
| | बृहन्मुंबई महानगरपालिकेतील झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूरीचे कामकाज करणारे तांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांना प्रतिनियुक्तीवर प्राधिकरणात पाठविण्याचा निर्णय. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्याकडील आदेश क्र. एमजीसी/सी/१०५० दि. १७/९/९६ अन्वये त्यांच्याकडे |

३८/७

| | | |
|---|---|---|
| | | सध्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना मंजुरी देणाऱ्या १७ तांत्रिक अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाकडे वर्ग करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.<br>कालमर्यादा नाही. तथापि आदेश अद्याप निर्गमित झालेले नाहीत. |
| प्रारूप विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) ला अंतिम स्वरूप देण्याची कार्यवाही चालू असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांना योजनेला मंजुरी देण्यासंबंधी एम.आर.टी.पी. अधिनियम १५४ खालील अधिकार प्रदान करण्याबाबत. | अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास विभाग. | |
| बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनाबाबत व त्यांच्या बसण्याच्या व्यवस्थेसंबंधी निर्णय झाला. | मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण. | प्राधिकरणाला निगम निकायचा दर्जा मिळाल्यामुळे शासन गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांनी प्राधिकरणास रु. २ कोटीचे कर्ज मंजूर केले असून वेतन देण्याच्या संदर्भात आता अडचण असणार नाही. तसेच बसण्याच्या व्यवस्थेसंदर्भात म्हाडाच्या गृहनिर्माण भवनातील पूर्ण पाचवा मजला प्राधिकरणाला देण्यासंबंधी म्हाडाला दि. ~~२३/९/१९९६ रोजी~~ [illegible] ~~रोजी पत्र पाठविले आहे~~ [illegible] बैठकीमध्ये आदेश देण्यात आले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला निगम निगायचा दर्जा सत्वर दिला जावा असे ठरले. | गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग आणि विधी व न्याय विभाग. | सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १५ गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई-३२, दि. ३०/९/९६ अन्वये प्राधिकरणाला निगम निकायचा दर्जा देण्यात आलेला आहे. |
| कोस्टल झोन नियमावली केंद्रशासन यांच्या नियमावली अन्वये जर समुद्रकिनारा किंवा खाडीजवळ संक्रमण शिबीरे बांधण्यात अडचण असेल तर दुसरीकडे जमीन पहावी व तेथे संक्रमण शिबीराच्या बांधकामास सुरुवात करावी असे ठरले. तसेच संक्रमण शिबीराच्या संदर्भात संबंधित विभागाच्या ३-४ अधिकाऱ्यांनी आठवडयातून एकदा एकत्र बसून त्वरीत निर्णय द्यावेत व योजनेची अंमलबजावणी शीघ्रतेने करावी असे ठरले. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, उपाध्यक्ष, म्हाडा, प्रधान सचिव, महसूल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण. | कालमर्यादा नाही. परंतु कार्यवाही शीघ्रतेने केली जात आहे |

| | | |
|---|---|---|
| टी.बी. हॉस्पीटल व कस्तुरबा हॉस्पीटल जवळील झोपडपट्टी वासियांच्या पुनर्वसन योजना मंजूर करण्याबाबतचे ठरले. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | कार्यवाही केली जात आहे. [illegible] |
| ज्या ठिकाणी शासनाच्या जमिनी रिकाम्या आहेत त्या ठिकाणी त्वरित संक्रमण शिबिरे बांधण्याचा निर्णय झाला. म्हाडाच्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रिक्त जमिनींवर संक्रमण शिबीरांच्या बांधकामाना सत्वर सुरुवात करण्यासंबंधी निर्णय झाला. | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रधान सचिव, महसूल मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण. | तीन महिन्याची कालमर्यादा. कार्यवाही चालू आहे. |
| म्हाडाचे ५०० संक्रमण गाळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी आरक्षित करण्याचा निर्णय झाला. | उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा. | म्हाडाने दि. १७/९/९६ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. |